**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार दिनांक १९ नोव्हेंबर २०२४**

**ठळक बातम्या**

- **राज्यातल्या २८८ विधानसभा मतदार संघांसाठी तसंच नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीसाठी उद्या मतदान.**
- **नागपूरसह विदर्भात मतदान यंत्रणा सज्ज; वैशिष्टयपूर्ण मतदान केंद्र करणार मतदारांना आकर्षित.**
- **इफ्फी अर्थात आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाला उद्यापासून गोव्यात आरंभ.**
- **नागपूरच्या अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था एम्स इथं 22 नोव्हेंबर पासून दोन दिवसीय 'नेप्टीकॉन 2024' या राष्ट्रीय परिषदेचं आयोजन.**

उद्या मतदान

राज्यात विधानसभा निवडणुकीत उद्या होणाऱ्या मतदानासाठी निवडणूक यंत्रणा सज्ज झाली आहे. राज्यातल्या २८८ विधानसभा मतदार संघांसाठी तसंच नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीसाठी उद्या मतदान होणार आहे. राज्यात नऊ कोटी ७० लाख २५ हजार ११९ मतदार असून; त्यांच्यासाठी एक लाख ४२७ मतदान केंद्रांवर मतदानाची व्यवस्था करण्यात आली आहे. सकाळी सात ते संध्याकाळी सहा वाजेपर्यंत मतदानची वेळ असून, राज्यातल्या मतदारांनी मोठ्या संख्येने मतदान करावं असं आवाहन, मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी केलं आहे. या निवडणुकीसाठी मुक्त वातावरणात, निष्पक्ष आणि शांततेत मतदान पार पाडण्यासाठी पोलीस यंत्रणा देखील सज्ज आहे. राज्यातल्या २८८ मतदार संघांमध्ये १५८ पक्षांकडून २ हजार ५० उमेदवार रिंगणात आहे. उर्वरित २ हजार ८६ अपक्ष उमेदवार आहेत. सर्वाधिक २३७ उमेदवार बहुजन समाज पार्टीनं उभे केले असून वंचित बहुजन आघाडीचे २०० उमेदवार रिंगणात आहेत. भाजपानं १४९, मनसेनं सव्वाशे, कॉंग्रेसनं १०१ उमेदवारांना निवडणुकीत उतरवलं आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून ९५, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून ८६, शिवसेना पक्षाकडून ८१, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाकडून ५९ उमेदवार नशीब आजमावत आहेत. राष्ट्रीय समाज पक्षाकडून ९३, महाराष्ट्र स्वराज्य पक्षाकडून ३२, प्रहार जनशक्तीचे ३८, माकपाचे ३, MIM चे १७, धर्मनिरपेक्ष जनता दलाचे ४, जनसुराज्य

शक्तीचे ६, शेकापचे १८, समाजवादी पार्टीचे ९ आणि भाकपाचे २ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत.

नागपूर मतदान तयारी

नागपूर जिल्ह्यातून सर्वाधिक मतदान व्हावे यासाठी नागपुरकरांसह जिल्ह्यातील मतदार न चुकता मतदान करतील, असा विश्वास जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी व्यक्त केला.मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्याच्या दृष्टीने 4 हजार 631 मतदान केंद्रांवर विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. सूमारे 3 हजार 460 मतदान केंद्राचे वेबकास्टिंग केले जाणार आहे. शहरी भागात 2 हजार 169 म्हणजेच 100 टक्के मतदान केंद्राचे वेबकास्टिंग होईल. ग्रामीण भागातील 53 टक्के म्हणजेच 1 हजार 291 मतदान केंद्रावर वेबकास्टिंग होणार असल्याची माहिती डॉ. विपीन इटनकर यांनी दिली. नागपूर जिल्ह्यात सूमारे 127 संवेदनशील मतदान केंद्र म्हणून घोषीत करण्यात आले असून या ठिकणी मॉयक्रो ऑब्झेर्व्हर नियुक्त करण्यात आले आहेत. याच बरोबर या ठिकाणी खबरदारीचा उपाय म्हणून केंद्रीय सशस्त्र पोलीस बल तत्पर ठेवण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. दिव्यांगांसाठी मतदान केंद्रांवर आवश्यक सोयी सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. ज्या ज्येष्ठ नागरिक व दिव्यांगांना मतदान केंद्रावर जाण्यास असमर्थता आहे अशा व्यक्तींसाठी सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालयामार्फत हेल्पलाईन क्रमांक जाहीर करण्यात आले आहे. यात 8329131808 आणि 8623825845 या क्रमांकांवर संपर्क साधता येईल. विधानसभा मतदारसंघासाठी यंदा प्रथम चक्रीका या ॲपचा वापर करण्यात येणार आहे असं जिल्हाधिकारी इटनकर म्हणाले.

***यावेळेस ईव्हीएम मशीन ज्या गाडीमध्ये जाणार मग ते झोनल असावं, की प्रिसायडिंग ऑफिसरच्या बसेस असावं, त्याच्यामध्ये चक्रीका ॲप नावाचा आपण एक ॲप डाऊनलोड त्यांना करायला सांगितला. जेणेकरून संपूर्ण इव्हीएम मुव्हमेंट त्याच्यामध्ये ट्रॅक होईल, तयारी पूर्णपणे झालेली आहेत. आणि यावेळेस विंटर असल्यामुळे गर्मीचा त्रास नसल्यामुळे वेदरही चांगला आहे. शेवटी हेच अपेक्षा आहे की, आमची तयारी 100% आहे, आता मतदातांचं पॉसिबिलिटी आहे, की ज्याप्रकारे लोकसभेमध्ये आपण त्या 75% आपलं टार्गेट होतं त्याच्यात चुकलो. आपण पण यावेळेस आपल्याला गोल्डन अपॉर्च्युनिटी आहे की सगळ्या वोटर्सनी आपल्या घरी***

***कसलाही रिजन न देता सकाळीबाहेर पडून ज्या पोलिंग स्टेशनवर आपलं नाव आहे, तिथे जाऊन मतदान करावं आणि नागपूर जिल्हयाला डिस्ट्रिक्शनमध्ये पास करेल हा माझं विश्वास आहे.***

निवडणूक सज्जता

वाशिम जिल्हयातील ११०० मतदान केंद्रे सज्ज करण्यात आली आहेत. वाशिम जिल्हयातील एकूण मतदारसंख्या १० लाख ९ हजार १०७ आहे. यामध्ये पुरुष मतदार ५ लाख २१ हजार ८५८ तर महिला मतदार ४ लाख ८७ हजार २३० आहेत. त्याचबरोबर एकूण १९ तृतीयपंथीय मतदार आहेत. गोंदिया जिल्हयात अकरा लाख 25 हजार 100 मतदार असून सर्वाधिक स्त्री मतदार जिल्हयात आहेत. त्याचप्रमाणे जिल्हयात 1285 मतदान केंद्रावर मतदान साहित्य आज पोहोचले आहे. आज सकाळपासून मतदान साहित्य ईव्हीएम, व्हीव्हीपॅट तसेच इतर मतदान साहित्य वाटप सुरू झालं आहे. भंडारा जिल्हयातील साकोली विधानसभा मतदार संघातील मॉजा वलमाझरी इथं आदर्श मतदार केन्द्र तयार करण्यात आले आहे. या केन्द्रात विविध जैव विविधतेचे दर्शन आणि वन्यप्राण्याविषयी आपुलकी सांगणारे संदेश छत्रांच्या माध्यमातून देण्यात आले आहे. मतदान केंद्राच्या प्रवेश द्वारावर सुंदर गुहा साकारण्यात आली आहे. हे मतदान केन्द्र सपुर्ण राज्यात आकर्षणाचे केन्द्र झालेले आहे. यवतमाळ जिल्हयातील सात विधानसभा मतदारसंघासाठी 2578 मतदान केंद्रांवर उद्या मतदान घेतले जाणार आहे. यासाठी पोलीस अधिकारी, कर्मचारी आणि बंदोबस्तान करिता असलेले जवान असे एकूण 16 हजार 351 कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहे. निवडणूक कर्तव्यावर असणाऱ्या प्रत्येकाचे मतदान व्हावे यासाठी पोस्टल बॅलेट आणि ईडीसी अशा दोन्ही प्रक्रिया राबवल्या जात आहेत. त्यात आतापर्यंत 6 हजार 886 जणांचे मतदान झाले आहे. निवडणूक शांततेत पार पडावी यासाठी पोलीस बंदोबस्त देखील तैनात करण्यात आला आहे. मतदान प्रक्रियेत वयोवृद्ध, दिव्यांग व्यक्तींचे गृह मतदान घेण्यात आले.

विनोद तावडे/कॉंग्रेस पत्रपरिषद

क्षितीज ठाकूर यांच्या बहुजन विकास आघाडीने भाजपचे राष्ट्रीय सचिव विनोद तावडे यांच्यावर पैसे वाटल्याचा आरोप केला. मुंबईच्या विरार परिसरातील हॉटेल विवांतामध्ये बविआच्या कार्यकर्त्यांनी आज, मंगळवारी तावडेंना घेराव घातला. तब्बल 5 कोटी रुपयांचे वाटप झाल्याचा आरोप असून याप्रकरणी बविआने तावडेंच्या विरोधात निवडणूक आयोगाकडे तक्रार केली आहे. दरम्यान तावडेंनी हे सर्व आरोप

फेटाळून लावत सीसीटीव्ही फुटेज तपासून निष्पक्ष चौकशीची मागणी केली आहे. दरम्यान, विरोधक पराभवाच्या भीतीने विनोद तावडे यांना बदनाम करण्याचा प्रयत्न करत असल्याची प्रतिक्रिया भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे. या प्रकरणात निवडणूक आयोगाने काय गुन्हा दाखल केला हे जनतेपुढे आले पाहिजे अन्यथा आम्ही आयोगापुढे धरणे आंदोलन करू अशी माहिती काँग्रेसचे प्रवक्ते सचिन सावंत यांनी मुंबईत घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली. दरम्यान, काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नाथला यांनी विनोद तावडे यांना तात्काळ अटक करण्याची मागणी केली आहे.

अनिल देशमुख

नागपुरात पारडशिंगा इथं माजी गृहमंत्री अनिल देशमुखयांच्या गाडीवर काल रात्री दगडफेक झाली. या घटनेत देशमुख यांच्या डोक्याला मार लागला असून या प्रकरणाचा तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. हिंगोली जिल्हयात कळमनुरी विधानसभा मतदारसंघातले वंचित बहुजनआघाडीचे उमेदवार डॉ. दिलीप मस्के यांच्या गाडीवर देखील  रात्री दगडफेक झाली. त्यांत डोक्याला मार लागल्यानं मस्के यांच्यावर नांदेडच्या खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

इफि

इफ्फी अर्थात आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाला उद्यापासून गोव्यात सुरुवात होत आहे. या महोत्सवात ८१ देशांमधले एकूण १८० चित्रपट प्रदर्शित केले जातील. गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी काल वार्ताहर परिषदेत या महोत्सवाच्या आयोजनाबाबत माहिती दिली. महोत्सवस्थळी जाण्यासाठी विनाशुल्क वाहनव्यवस्था तसंच चोख सुरक्षा व्यवस्था असल्याचं त्यांनी नमूद केलं. जागतिक चित्रपटाच्या दुनियेतले आगळेवेगळे स्वर आणि नवोन्मेषशाली कथन अधोरेखित करणाऱ्या इफ्फी या महोत्सवाचं हे पंच्चावन्नावं वर्ष आहे. इफ्फी हा जागतिक सिनेमाविश्व आणि सांस्कृतिक देवाणघेवाणयांचा महोत्सव 28 नोव्हेंबरपर्यंत चालणार आहे.

'नेप्टीकॉन 2024'

नागपूरच्या मिहान स्थित अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था एम्स इथं  येत्या 22 ते 23 नोव्हेंबर दरम्यान फार्माकोलॉजी विभाग, नॅशनल असोसिएशन ऑफ फार्माकोलॉजी अँड थेराप्यूटिक्सच्या मार्गदर्शनाखाली, फार्माकोलॉजीमध्ये पदव्युत्तर

अभ्यासक्रम शिकवणारे शिक्षक आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी तिसऱ्या 'नेप्टीकॉन 2024' या राष्ट्रीय परिषदेचं आयोजन करण्यात आलं आहे. या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेची संकल्पना 'सर्वोत्तम आरोग्यसेवेसाठी आधुनिक फार्माकोलॉजीतील नवनवीन सीमा शोधणे" अशी असल्याची माहिती 'नेप्टीकॉन 2024' चे आयोजक सचिव डॉ.गणेश डाखळे यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. याप्रसंगी एम्स नागपूरचे कार्यकारी संचालक डॉ.प्रशांत जोशी उपस्थित होते. या परिषदेत औषध निर्माण कंपन्यांमधील तज्ज्ञ तसेच महत्त्वाच्या राष्ट्रीय संस्थांमधील शैक्षणिक तज्ज्ञांना आमंत्रित करण्यात आलं असून NAPTICON-२०२४ मध्ये ५५० हून अधिक प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. या परिषदेमध्ये औषध संशोधन, रोग व्यवस्थापनामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर, रुग्णांमध्ये क्लिनिकल ट्रायल्स अशा विविध विषयांवर फार्मा इंडस्ट्री त्याचप्रमाणे वैद्यकीय संशोधन क्षेत्रातील तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत.

*****